जा.क्र./का.न.प./ई-निविदा सुचना/ /२०२१-२२

नगरपरिषद कार्यालय, कागल.

दिनांक – / /२०२१

## कागल नगरपरिषद, कागल

## जाहीर ई-निविदा सुचना क्र. /२०२१-२२

मुख्याधिकारी,कागल नगरपरिषद कागल कडील मागणी प्रमाणे सोलर सिस्टीम क्षेत्रात काम करणेस इच्छुक असणा-या एजन्सी, फर्म अथवा संस्था महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा) अथवा MNRE मान्यताप्राप्त यांचे अधिकृत यादी मधील नोंदणीकृत व अनुभवी कॉन्ट्रॅक्टर, फर्म/ व्यक्ती यांचे कडून प्रति युनिट दर पध्दतीने खाली दर्शविलेल्या कामासाठी निविदा मागवित आहेत. या निविदेचा तपशील http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक १७/१२/२०२१ रोजी सकाळी १४.०० वा. ते ०७/०१/२०२२ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे.

को-या निविदा संचाची किंमत रु.५०००/- Online पध्दतीने मुख्य अधिकारी, कागल नगरपरिषद, कागल यांचे नांवे भरून को-या निविदा Download करता येतील, तसेच सदरची निविदा दिनांक ०७/०१/२०२२ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत Upload करता येईल.

| अ.नं. | कामाचे नांव | कामाची मुदत | कोरी निविदा संचाची किंमत |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | कागल नगरपरिषद कागलकडे १.१ मेगा व्हॅट क्षमतेचा सोलर प्रकल्प १००% BOT तत्वावर उभा करणे.सदर प्रकल्प २५ वर्षे कालावधीकरीता कार्यान्वित करणे(१५ वर्षे कंपनीकडे व उर्वरीत १० वर्षे नगरपरिषदेकडे) व देखभाल दुरुस्तीसह प्रति युनिट दर देणे. | ६ महिने | रु.५०००/- (GST सह) |

**टिप –** १.वरील कामाबाबतच्या अटी व शर्ती इ. बाबतचा सविस्तर तपशिल निविदासंचामध्ये नमुद केलेला आहे.

२. निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करणे, वाढविणे अथवा कमी करणे तसेच प्राप्त निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

३. नगरपरिषदेकडे मक्तेदार नोंदणी बंधनकारक राहील.

४. शक्य झाल्यास Online पध्दतीने सादर केलेल्या निविदा दि. ०६/०१/२०२२ रोजी दुपारी १६.०० वाजता http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर मुख्य अधिकारी, कागल नगरपरिषद,कागल यांचे कार्यालयात उपस्थित मक्तेदार अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीचे उपस्थितीत उघडणेत येतील.

सर्वास कळावे, दिनांक :- १७/१२/२०२१

**श्री.पंडीत खंडु पाटील**
**मुख्यअधिकारी**

**सौ.माणिक रमेश माळी**
**नगराध्यक्षा**

# कागल नगरपरिषद,कागल

# निविदा अर्ज

**कागल नगरपरिषद, कागल**

**कामाचा तपशिल**

**अ) प्रसिध्द निविदेमधील कामाचा क्रमांक-**

**ब) कामाचे सामान्य वर्णन नांव** ------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

**क) मक्तेदाराचे नांव -** ------------------------------------------------------------------------------

दि. / /२०२१) हे टेंडर मंजुर झालेनंतर सोबतच्या शर्ती पाळण्याचे व त्या पुर्ण करण्याचे मी/आम्ही मान्य करता त्यात कसुर झालेस करारातील अटीमध्ये नमुद केलेल्या रक्कमावरील हक्क सोडून देण्यास व ती नगरपरिषदेस देण्यास माझी/ आमची संमती आहे.

**शर्ती/अटी**

**सोलर प्रकल्पासंबंधीत अटी –**

१. सदर प्रकल्पाची क्षमता २५ वर्षे इतकी आहे. याबाबत महाऊर्जा व महावितरण यांच्याकडून प्रमाणपत्र घेऊनच विज निर्मितीला सुरुवात करावी. तसेच प्रकल्पाची क्षमता २५वर्षे असल्याने प्रकल्प पुढे चालु राहणेसाठी विकासकाने १५ वर्षानंतर सदर प्रकल्प योग्यस्थितीत विनामुल्य नगरपरिषदेला हस्तांतरीत करावा.

२. सदरची जागा ज्या प्रयोजनार्थ देण्यात येणार आहे, त्याच प्रयोजनार्थ वापर करावा .

३.मालमत्ता ज्या अटी शर्तीवर देण्यात आली आहे त्या अटी शर्तींचा भंग झालेस तात्काळ कार्यवाही करणेत येईल.

४. करारनामा अंतिम करण्यापूर्वी त्याच्या प्रारुपास नगरपरिषद संचालनालयाची मान्यता घेण्यात यावी.

५. नगरपरिषद प्रशासन संचालनालय वरळी, मुंबई यांनी सुचविलेल्या करारनाम्यातील सुधारणा/अटी ठेकेदारावर बंधणकारक राहतील तसेच याबाबत कोणतीही तक्रार करता येणार नाही.

६. सदर प्रकल्प महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) व महावितरण यांच्या निर्देशानुसार पुर्ण करण्याची जबाबदारी विकासकाची राहील.

७. १५ वर्षाच्या कालावधीत निर्माण होणारी वीज फक्त नगरपरिषदेच्या वापरासाठी राहील. तसेच विकासकाकडून निर्माण होणारी जादा वीज युनीट नगरपरिषदेच्या नावावर डिपॉझीट करण्यात यावी. विकासकास वीज बाहेरील संस्था/ व्यक्ती यांना विकता येणार नाही.

८. प्रकल्पाचा देखभाल दुरूस्ती खर्च विकासकाने करावा.

९.सदर प्रकल्प स्थापित करण्यासाठी केंद्र शासनाने ऊर्जा मंत्रालय व भारतीय सौरऊर्जा निगम लिमिटेड यांनी वेळोवेळी जाहिर केलेल्या तांत्रिक परिमाण व प्रचलित पध्दतीचा अवलंब करावा.

१०.महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) यांचे ११.०३.२०१९ रोजीच्या तांत्रिक मंजुरी आदेशातील अटी शर्ती लागु राहतील.

११. राज्याचे नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोत (अपारंपारीक ऊर्जा स्त्रोत) यापासून वीज निर्मितीच्या पारेषण सलग्न प्रकल्पासाठीचे एकत्रीत धोरण-२०१५ मधील नगरपरिषद व विकासकाला कार्यपध्दती बंधनकारक राहील.

१२. सदरचा प्रकल्प नगरपरिषद स्वयंवापरासाठी महावितरण कडून नेट मिटरिंग प्रवेशाद्वारे आंमलात आणेल.

१३. राज्याचे नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्त्रोत (अपारंपारीक ऊर्जा स्त्रोत) यापासून वीज निर्मितीच्या पारेषण सलग्न प्रकल्पासाठी धोरण-२०१५. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. अपाऊ-२०१५/प्र.क्र.४९/ऊर्जा-७ दिनांक २० जुलै २०१५ चे कार्यपध्दती बंधणकारक राहील.

१४. सौर ऊर्जा पासून वीज निर्मिती प्रकल्पासाठी शासन निर्णय क्र.अपाऊ/२०१५/प्र.क्र.४९/भाग-८/ऊर्जा -७ परिशिष्ट ई नुसार कार्यपध्दती निश्चित करणेत आलेली आहे, इच्छुक व्यक्ती अथवा संस्था यांनी या कार्यपध्दतीचा अभ्यास करूनच ई-निविदा प्रक्रीया पूर्ण करावी.

१५. सदर प्रकल्पापोटी नगरपरिषद कोणतीही आर्थिक गुंतवणूक करणार नाही. संपूर्ण प्रकल्प उभा करणेची जबाबदारी संबंधीत विकासकाची राहील.

१६. प्रकल्प करारनाम्यास DMA ची मंजुरी घेणेत येईल आणि सदर करारनाम्याची मुदत १५ वर्षे राहील.

१७. ई-निविदेमध्ये मंजुर दर DPR मधील Financial Analysis नुसार प्रतिवर्षी वाढत राहतील. सदरची वाढ महावितरणच्या दरवाढीशी निगडीत राहील. महावितरणच्या दरामध्ये व कंपनीच्या दरामध्ये किमान दर रु.५ ते ६ इतक्याने कमी राहील.

१८. सदर प्रकल्पासाठी DPR प्रमाणे १.१ मेगाव्हॅट वीज निर्मीती करणे अनिवार्य राहील.

१९. सदर निविदा महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा), MNRE अथवा MSME मान्यताप्राप्त मक्तेदारानेच भरणेची आहे.प्री-बिड मिटींगसाठी व नगरपरिषदेकडील नोंदणीसाठी वरील मान्यता प्राप्त मक्तेदाराने हजर राहणे आवश्यक आहे.

२०. कमीतकमी १.१ मेगाव्हॅट पेक्षा जास्त क्षमतेचा सोलर प्रकल्प उभारणी केल्याचे कागदपत्र जोडणे आवश्यक राहील. आर्थिक क्षमता प्रमाणपत्र (Solvency Certificate) अनिवार्य राहील. विकासकाची आर्थिक क्षमता कमीतकमी रु.५कोटी असावी.

२१. सदर प्रकल्पासाठी आवश्यक जागा नगरपरिषदेमार्फत करारनामाकरून उपलब्ध केली जाईल.

२२. महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, हवामान खाते, नगर रचना कार्यालय यांचे कडील मार्गदर्शनानुसार काम करणेचे आहे.

२३. सदर प्रकल्पाकरिता शासन स्तरावरील आवश्यक मंजुरी परवाने घेणेची जबाबदारी संबंधीत मक्तेदाराची राहील.

२४. सदर प्रकल्पाचा देखभाल दुरूस्ती खर्च व MSEB पर्यंत टाकाव्या लागणा-या विद्युत व्यवस्थेचा खर्च प्रकल्प कार्यान्वीत झालेनंतर संबंधीत मक्तेदाराने करणेचा आहे.

२५. नगरपरिषदेच्या मागणीवरून जादा विजेची निर्मिती करावी लागलेस वाढीव विज निर्मिती करणे अनिवार्य राहील. त्यासाठी आवश्यक असणारी जागा नगरपरिषदेकडून उपलब्ध करून दिली जाईल.

२६. सदर सौर उर्जा प्रकल्पाचे आयुष्यमान २५ वर्षे असलेचे तांत्रिक प्रमाणपत्र सादर करणे बंधणकारक राहील.

२७. विकासकाने निर्माण केलेल्या वीज युनिटचे टेंडर रेट प्रमाणे देयक अदा करणेत येईल. विज युनिट दरामध्ये होणा-या बदलास मा.संचालक नगरपरिषद प्रशासन यांची मान्यता घेणे बंधणकारक असेल.

२८. प्रकल्पाचे नैसर्गीक , अनैसर्गीक,जनावरे, वादळे इ. आपत्तीमुळे नुकसान झालेस दुरूस्ती करणेची जबाबदारी विकासकाची राहील.

२९. प्रकल्प उभारण्यासाठी दिलेल्या जमिनीमध्ये कोणतेही पक्के बांधकाम करता येणार नाही व तलावामध्ये येणाऱ्या पाण्यास प्रतिरोध होईल असे कोणतेही भौगोलिक बदल करता येणार नाहीत.

३०. Net Metering नुसार देयके अदा केली जातील. कंपनीमार्फत मागणी केलेल्या देयकाचे बील ७ दिवसाच्या आत अदा करणेची जबाबदारी नगरपरिषदेची राहील तसेच वित्त आयोगातून मिळणाऱ्यानिधीतून देयके अदा करणेसाठी मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांची मंजुरी घेणेची जबाबदारी नगरपरिषदेची राहील.

३१.सदरचा प्रकल्प उभारताना सौर पॅनेल व इतर बाबीMNRE प्रमाणीत भारतीय बणावटीच्या असणे अनिवार्य राहील.

**इतर शर्ती व अटी -**

१. सदर कंपनीने ई-निविदा दर G.S.T. सहीत नमुद करावेत. G.S.T.कामी अतिरीक्त देयक अदा केले जाणार नाही.

२..पॅन कार्ड ची छायाप्रत सोबत जोडणे बंधनकारक राहील.नगरपरिषदेकडे मक्तेदार नोंदणी बंधनकारक राहील.

३.सदरील कामाबाबत वापरणेत येणारे मजूर / मटेरियल इ. बाबींचा विमा उतरविणेची जबाबदारी मक्तेदारावर राहिल.तसेच पुरविणेत आलेले मशिन व इतर साहित्य यांची चाचणी विभागातील कर्मचारी याना मंजुर निविदाधारक मक्तेदार यानी देणेची आहे. लेबर ॲक्टनुसार कामगारांबाबतच्या पी.एफ./विमा तसेच इतर आवश्यक शासकीय भरणा करणेची जबाबदारी संबंधीत ठेकेदार यांची राहील. नगरपरिषदेची सदर बाबत कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

४.निविदा मंजुरीची समज दिल्यापासुन ७ दिवसातच मक्तेदाराने करार करुन दिला पाहिजे. करारनाम्यास अधीन राहून वर्क ऑर्डर दिली जाईल, करारनामा झालेवर वर्क ऑर्डर दिली जाईल. कामाची प्रगती त्यासाठी असलेल्या मुदतीच्या

प्रमाणात योग्य ती ठेवली पाहिजे. मुदतीनंतर इकडील नियमाप्रमाणे करारपत्रात नमुद केल्याप्रमाणे दंड आकारला जाईल. निविदेमध्ये काम पुर्ण करण्यास दिलेली मुदत मक्तेदाराने तंतोतंत पाळली पाहिजे या मुदतीचा प्रारंभ कामाचा आदेश दिलेल्या तारखेपासुन धरला जाईल.

५.सदर प्रकल्पासाठी मिळणारी सबसीडी ही विकासकास मिळेल.

६.मुदतील काम पुर्ण करणेची जबाबदारी मक्तेदार व तद्नंतर जामीनदार यांची आहे. मुदत संपले नंतर नगरपरिषद केव्हाही मक्तेदार, जामीनदार यांना १ (एक) महिन्याची नोटीस देवून राहीलेले काम पुर्ण करणेस फर्मावतील. त्या मुदतीत काम न झालेस योग्य त्या प्रकारे काम नगरपरिषद पुर्ण करुन घेईल. त्यामध्ये होणा-या सर्व प्रकारच्या नुकसानीस मक्तेदार, जामीनदार जबाबदार राहतील.

७.करारातील अटी/ शर्तीनुसार मक्तेदार नुकसान भरपाई देण्यास जबाबदार असेल अशावेळेस तसेच भयंकर आजारामुळे किंवा त्यांच्या मृत्युमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे जर काम करणेस असमर्थ असेल तर नगरपरिषदेचे हितार्थ योग्य वाटेल असा मार्ग स्विकारणेचा नगरपरिषदेस अधिकार राहिल.

८.सदरील काम नगरपरिषदेने नेमलेले अधिकारी यांचे देखरेखीखाली व त्यांचे पसंती प्रमाणे कामाचे योग्य ते मटेरियल वापरुन काम चांगल्या प्रकारे पुर्ण करुन देणे मक्तेदारावर बंधनकारक राहील. योग्य त्या प्रतीचे काम झाले नसल्यास अगर कमी प्रतीचे साहित्य कामावर दिसून आलेस ते मक्तेदाराने स्वखर्चाने काढून टाकून चांगल्या प्रकारचे दुसरे साहित्य वापरुन काम पुर्ण करुन देईल. त्याबद्दल मक्तेदारास जादा आकार मागता येणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रारही करता येणार नाही.

९.आवश्यकतेनुसार मंजुर कामापेक्षा जादा काम करावे लागलेस त्याचा दर प्रचलित जिल्हा दर सुची प्रमाणे राहील.

१०.लेबर लायसन्सची जबाबदारी मक्तेदारावर राहील. कामावरील मजुरांना किमान वेतन कायद्याप्रमाणे रक्कम आदा करणेची जबाबदारी मक्तेदाराची राहील.

११.कामावर आदेश पुस्तक (ऑर्डर बुक ) ठेवणेची जबाबदारी मक्तेदाराची असून तसे न केलेस मक्तेदारास रु. ५००/- इतका दंड आकारणेत येईल.

१२.मंजुर काम चालु असताना कोणतीही जिवीत अथवा वित्तीय हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत मक्तेदारावर राहील.

१३.महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ व महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, १९७१ तदनुषंगिक सर्व संबंधीत तरतुदी व नियम हे मक्तेदारांवर बंधनकारक राहतील.

१४.निविदासंबंधी शासनाने वेळोवेळी विहीत केलेले सर्व नियम/अटी/ शर्ती लागू राहतील व वादाचे विषयात त्या नियम, शर्ती अटीनुसार निर्णय घेतला जाईल.

१५. प्राप्त निविदा पैकी कोणतेही ही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकरण्याचे सर्वस्वी अधिकार निवीदा समितीकडे राहतील.

१६.वरील सर्व अटी/शर्ती मक्तेदारास व त्याचे कायदेशीर वारसास बंधनकारक राहतील.

१७.सदर निविदा ही विकासक निश्चित करणेसाठी सोलर पार्कची उभारणी करणेकामी प्रसिध्द करणेत आलेली आहे.

१८.प्रकल्प सुरु झालेनंतर महावितरण, महाऊर्जा, नगरपरिषद प्रशासन संचालनालय मुंबई व इतर वरिष्ट कार्यालयामार्फत अतिरिक्त अटी लागु केलेस त्याअटी विकासाकावर बंधनकारक राहतील

वरील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**मक्तेदाराची सही**

**कार्यालयीन वापरासाठी**

**निविदा उघडलेची तारीख व वेळ -**
**निविदेमध्ये खाडाखोड आहे/नाही -**

**मुख्याधिकारी**
**कागल नगरपरिषद, कागल.**

## परिशिष्ट - अ
## प्रतिज्ञापत्र

मी/आम्ही याद्वारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१) आय व कलम ४४ (१)(ब) तरतुदीच्या ज्या खाली उदधृत केलेल्या आहेत, माहिती आहे आणि गंभीरपणे नमुद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्यावतीने करण्यात येणा-या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा आमच्याशी भागिदारी नाही.

कलम १६(१)(आय) :- यापुर्वी तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्यावतीने केलेल्या कोणत्याही संविदेत जिचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल.

कलम ४४(१)(ब) - पालिका सदस्य म्हणून किंवा नगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणुन ज्या कोणत्याही बाबतीत कलम १६ व पोट कलम(३), खंड(अ),(ब), (क),(ड) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्यांना किंवा त्यांच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीतीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल. पण अशा हिश्श्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो, किंवा-जीत त्याचा अशीलाच्या प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तींच्यावतीने व्यावसायिकदृष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान राहील.

निविदा धारकांचे नांव - ------------------------------------------------------------

पत्ता ---------------------------------------------------------------------------

निविदा धारकांची सही

दिनांक - / /२०२१

साक्षीदाराचे नांव - ------------------------------------------------------------

पत्ता ----------------------------------------------

साक्षीदाराची सही

दिनांक - / /२०२१